# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/08/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. भिवापूर** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील तास येथे दिनांक १४/०८/२०२३ चे १५.४० वा. ते १६. ०० वा. दरम्यान शेतातील पिकाला फवारणीचे औषध घेण्याकरीता ॲक्टीवा गाडी क्र. एम. एच.– ४०/ए. वाय– ३८८७ चा चालक मृतक नामे – आनंदराव किसन खोड, वय ५४ वर्ष, रा. रानमांगली त. भिवापुर व जखमी नामे– कमलेश आनंदराव खोंडे, वय २० वर्ष रा. रानमांगली हे रानमांगली वरून भिवापुरकडे उमरेड ते नागभिड हायवे रोडने जात असता मृतक हे स्वत: मोपेड गाडी चालवुन मौजा तास शिवारात अंदाजे वेळ १६/०० वा. दरम्यान समोर जात असलेल्या ट्रक क्र. एम. एच–३४/ए बी– ५६१४ ला मृतकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निश्काळजीपणे ट्रकचे उजवे साईडने ओव्हरटेक करत असतांना विरूध्द दिशेने समोरून एक अज्ञात वाहन आल्याने मृतक मोपेड गाडी ही डाव्या बाजुने घेण्याचा प्रयत्नात ट्रकच्या मागील चाकाला धडक लागल्याने जखमी रोडचे उजव्या बाजुला खाली पडले व मृतक हे ट्रकच्या मागिल चाकात येवुन गंभीर जखमी होवुन स्वत:चेच मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोहवा मधुकर डेकाटे, पोलीस स्टेशन भिवापूर यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. भिवापूर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा किशोर डेकाटे मो. नं. ७४९८०२०३९९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर